RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३०४५१

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

दि. ०३ जुलै २०२६



१९२७ - सर कावसजी जहांगीर हॉल, मुंबई येथे सभा. तसेच मुंबई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली महाड येथील अस्पृश्यांवरील अत्याचाराचा निषेध.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

शुक्रवार ०३ जुलै २०२६ | वर्ष : ६ | अंक : १८३ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Friday, 03 July 2026 | Year : 6 | Issue : 183 | Daily | Rate: Rs. 5/-

## महत्वाच्या बातम्या

### बांगलादेशात हिंदू पुजाऱ्याला विवस्त्र करून मारहाण

**नवी दिल्ली :** भारताच्या सीमेला लागून असलेल्या बांगलादेशात एका हिंदू पुजाऱ्याला अमानुष मारहाण करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. सुभाष देऊरी असे २५ वर्षीय पुजाऱ्याचे नाव असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे बांगलादेशातील अल्पसंख्याक समुदायात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. २९ जून रोजी सुभाषचे अज्ञात व्यक्तींनी अपहरण केले आणि त्याच्या कुटुंबियांकडे खंडणीही मागितली. इतक्यावरच न थांबता आरोपींनी त्याचा शारीरिक आणि मानसिक छळही केला, असे स्थानिक माध्यमांच्या वृत्तात नमूद करण्यात आले आहे. या घटनेची ढाका पोलिसांनी गंभीर दखल घेतली असून आरोपींचा शोध सुरू केला आहे. स्थानिक माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, ढाका येथील जगन्नाथ विद्यापीठात कायद्याचे शिक्षण घेणारा विद्यार्थी व मंदिराचा पुजारी सुभाष देऊरी याचे सोमवारी (२९ जून) एका टोळक्याने अपहरण केले. त्यानंतर अज्ञातस्थळी नेऊन त्याला अमानुष मारहाण केली.

### मुंबई, हिमाचल प्रदेश आणि जम्मूमध्ये पावसाचा हाहाकार



**नवी दिल्ली :** पहिल्या मान्सून पावसानंतर आज दिल्ली-एनसीआरला अंशतः दिलासा मिळाला. हवामान विभागाचे (आयएमडी) वरिष्ठ शास्त्रज्ञ नरेश यादव यांच्या मते, मान्सून लवकरच पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि गुजरातच्या पश्चिम किनारपट्टीच्या काही भागांसह अतिरिक्त क्षेत्रांमध्ये दाखल होईल. त्यांनी सांगितले की, पुढील चार ते पाच दिवसांत कोकण प्रदेश, गोवा आणि दक्षिण गुजरातमध्ये अतिवृष्टी होण्याची शक्यता असून, या भागांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. ओडिशा आणि मध्य भारतातही अतिवृष्टी अपेक्षित आहे. मुसळधार पावसामुळे मुंबईच्या अनेक भागांमध्ये गंभीर समस्या निर्माण झाल्याचे वृत्त आहे. पाणी साचल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पावसानंतर समोर आलेल्या छायाचित्रांमध्ये वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसून आल्या. जम्मू आणि काश्मीरच्या डोडा जिल्ह्यात झालेल्या दोन ढगफुटींमुळे जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले. हिमाचल प्रदेशातील लाहौल-स्पिती आणि चंबा येथे तीन ढगफुटींची नोंद झाली. उत्तराखंडमधील केदारनाथ तीर्थक्षेत्रासाठीची हेलिकॉप्टर सेवा स्थगित करण्यात आली आणि डेहराडूनच्या जॉली ग्रांट विमानतळावरून चार विमानांचे मार्ग बदलण्यात आले.

### ठाकरेंच्या दाव्यामुळे भाजपात खळबळ



**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राबवलेले ऑपरेशन टायगर यशस्वी झाल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे. त्या अंतर्गत ठाकरे गटातील सहा खासदार आणि विधानपरिषदेच्या एका आमदाराने शिंदेसेनेत प्रवेश केला आहे. ठाकरे गटातील आणखी काही आमदार शिंदेंच्या संपर्कात असल्याचा दावा केला जात आहे. यादरम्यान ठाकरे गटापाठोपाठ आता शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील काही खासदारही फुटणार असल्याची चर्चा सगळीकडे सुरू झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शरद पवार यांच्या पक्षाचे लोकसभेतील ७ खासदार सध्या भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील वरिष्ठ नेत्यांच्या संपर्कात आहेत. मात्र, हे खासदार नेमके कोणत्या पक्षात प्रवेश करणार, याबाबत अद्याप अधिकृत निर्णय झालेला नाही. या संभाव्य फुटीमागे शरद पवार आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करणार अशा जोरदार चर्चा कारणीभूत असल्याचे सांगितले जात आहे. राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांनी मात्र या चर्चांचे खंडन केले आहे.

# महाराष्ट्रात पाच वर्षांत १० टक्के महाविद्यालये बंद



**नागपूर :** केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या 'आयश' अहवालातील अधिकृत आकडेवारीने महाराष्ट्रातील महाविद्यालयीन शिक्षणाची संस्थात्मक दिवाळखोरी चव्हाट्यावर आणली आहे. विद्यापीठांतील घसरणीनंतर आता राज्यातील महाविद्यालयांचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. गेल्या पाच वर्षांत महाविद्यालयांची संख्या वाढण्याऐवजी तब्बल १० टक्के महाविद्यालये बंद पडली किंवा नामशेष झाली आहेत.

या संकटामागील सर्वात मोठे कारण म्हणजे प्राध्यापकांचा दुष्काळ. राज्यातील शासकीय व अनुदानित महाविद्यालयांमध्ये ५० टक्क्यांहून अधिक प्राध्यापक पदे रिक्त असून व्यवस्था तासिका तत्त्वावरील व कंत्राटी शिक्षकांच्या भरवशावर सुरू आहे. पूर्णवेळ शिक्षक, निधी आणि पायाभूत सुविधांच्या अभावामुळे ग्रामीण व निमशहरी महाविद्यालये 'नॅक' मानांकनात पिछाडीवर पडत आहेत. सरकारी व्यवस्थेतील या ढासळलेल्या परिस्थितीचा फायदा खासगी व स्वायत्त विद्यापीठांना झाला आहे. कौशल्याधारित अभ्यासक्रमांमध्ये ४५ टक्क्यांची वाढ झाली असली, तरी त्यांची फी सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आहे. त्यामुळे उच्च शिक्षणातील विषमता वाढून गरीब विद्यार्थी मुख्य प्रवाहातून बाहेर फेकले जात आहेत.

'कॉलेज डेन्सिटी' (महाविद्यालयीन घनता) ३२ वरून २८ वर आली. दर एक लाख (१८ ते २३ वर्षे) तरुणांमागील महाविद्यालयांची संख्या लक्षणीय घटली. वेळेवर अनुदान न मिळणे आणि पटसंख्येच्या २ जाचक अटींमुळे ग्रामीण भागातील अनेक महाविद्यालयांना कुलूप लागले, तर काही संस्था मोठ्या शैक्षणिक समूहांच्या घशात गेल्या. ४२ टक्के महाविद्यालयांमध्ये अद्ययावत 53 प्रयोगशाळा, डिजिटल ग्रंथालये व आधुनिक शैक्षणिक सुविधांचा अभाव आहे.

मुलींचा वाढता गळती दरः सरकारी वसतिगृहांचा अभाव व सुरक्षिततेच्या प्रश्नांमुळे मुलींचे शिक्षण मधेच सोडण्याचे प्रमाण १४ टक्क्यांनी वाढले. संशोधन निधीला कात्री संशोधन निधीत ३८ टक्क्यांची कपात झाल्याने संशोधन, नवकल्पना आणि पेटंट निर्मितीला मोठा फटका बसला. संशोधकांचा उतरता आलेख : गाई व फेलोशिपच्या टंचाईमुळे गेल्या तीन वर्षांत पीएच.डी. करणाऱ्यांची संख्या २२ टक्क्यांनी घटली.

'देशातील १४२० विद्यापीठांपैकी केवळ ३० टक्के आणि महाविद्यालयांपैकी फक्त २० टक्के संस्थांनीच नॅक मूल्यांकन केले आहे. २०-२५ वर्षांपासून प्राध्यापक पदे रिक्त, संशोधनासाठी जीडीपीच्या केवळ ०.६-०.७टक्के निधी, तर विकसित देश ३-५ टक्के खर्च करतात. अश परिस्थितीत विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी या संस्थांकडे का वळतील?

## मणिपूरमध्ये २० घरे जाळल्याप्रकरणी राहुल गांधींचा केंद्रावर हल्लाबोल



**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी गुरुवारी मणिपूरमधील ताज्या दुःखद घटनेवरून केंद्र सरकारवर टीका केली. ते म्हणाले की, राज्यात द्वेष आणि हिंसाचाराच्या आगीत किमान २० घरे जाळण्यात आली आहेत. एका वृत्तपत्राचा हवाला देत त्यांनी एका एक्स-पोस्टमध्ये केंद्र सरकारवर टीका केली.

गांधी म्हणाले की, दोन सरकारे आणि राष्ट्रपती राजवट असूनही राज्यातील संघर्ष अधिकच तीव्र होत आहे. ते म्हणाले, 'मणिपूर अनेक वर्षांपासून जळत आहे आणि आज पुन्हा द्वेष आणि हिंसाचाराच्या आगीत २० घरे जळून खाक झाली आहेत.' हजारो लोकांनी आपले प्राण गमावले आहेत आणि असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. मणिपूर जे असह्य दुःख सहन करत आहे, त्याची कल्पना करणेही कठीण आहे. गांधी पुढे म्हणाले की, मोदी सरकारची विभाजनकारी धोरणे लोकांना धर्म, जात, भाषा, प्रदेश आणि अस्मितेच्या आधारावर विभाजित करतात. त्यांनी नमूद केले की, हा मोदी सरकारच्या विभाजनकारी विचारसरणीचा परिणाम आहे. आज केवळ मणिपूरच नाही, तर संपूर्ण देशाने पंतप्रधानांकडून सहानुभूतीच्या एका शब्दाचीही आशा सोडून दिली आहे. मणिपूर यापेक्षा चांगल्या वागणुकीस पात्र आहे आणि हे साध्य करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे भारताला एकजूट करणे.

यापूर्वी २३ जून रोजी, हजारो महिला विक्रेत्यांनी धरणे आंदोलन केले होते. केंद्रीय यंत्रणांनी नुकत्याच केलेल्या गाव स्वयंसेवकांच्या अटकेबद्दल त्यांनी आपला संताप व्यक्त केला. मणिपुरी समाजातील एक शक्तिशाली आणि प्रभावशाली गट म्हणून, आंदोलकांनी राष्ट्रीय तपास संस्था (NIA), केंद्रीय अन्वेषण विभाग (CBI), केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) आणि मणिपूर पोलिसांनी अटक केलेल्या स्वयंसेवकांच्या तात्काळ सुटकेची मागणी केली. त्यांनी तीन अरंबई तेंगगोल (AT) स्वयंसेवकांच्या तात्काळ सुटकेचीही मागणी केली.

## जपानी प्रधानमंत्रींन धाकटी बहीण आणि एक दूरदर्शी नेत्या : प्रधानमंत्री मोदी

**नवी दिल्ली :** भारत आणि जपानने आज महत्त्वाच्या द्विपक्षीय करारांवर स्वाक्षरी केली. दोन्ही देशांमधील वार्षिक शिखर परिषदेनंतर, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि औषधनिर्माण क्षेत्राशी संबंधित करारांवरही स्वाक्षरी करण्यात आली. यानंतर, दोन्ही प्रधानमंत्रींनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. प्रधानमंत्री पदापलीकडे आपल्या आपुलकी आणि मानवी संबंधांसाठी जगभरात ओळखले जाणारे प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या जपानी समकक्षांना आपली धाकटी बहीण असे संबोधले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, 'माझी धाकटी बहीण, प्रधानमंत्री सनाए ताकाइची, दोन्ही शिष्टमंडळांचे आदरणीय सदस्य, प्रसारमाध्यमांचे सदस्य, नमस्कार आणि कोनिचिवा (जपानी भाषेत याचा अर्थ 'हॅलो' असा होतो).' ते पुढे म्हणाले, 'भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेसाठी प्रधानमंत्री ताकाइची यांच्या पहिल्या भारत दौऱ्याचे स्वागत करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. त्या जपानच्या पहिल्या महिला पंतप्रधान आणि एक दूरदर्शी व अत्यंत आदरणीय नेत्या आहेत. त्या नारा प्रांतातून येतात, जो भारत आणि जपानच्या सामायिक बौद्ध वारशाचे एक प्रमुख केंद्र आहे.

## मुंबई महापालिकेचे चार अधिकारी तडकाफडकी निलंबित



**मुंबई :** मुंबईतील चेंबूरमध्ये शाळेवर झाड पडून एका विद्यार्थ्याच्या मृत्युची घटना चर्चेत असतानाच, साकीनाका येथे एका व्यक्तीचा मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला. खैराणी रोडवरील सन्मान हॉटेलजवळ गुरुवारी (२ जुलै) दुपारी घडलेल्या या घटनेप्रकरणी मुंबई महापालिकेने सहाय्यक आयुक्तांसह चार अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. त्याचबरोबर या प्रकरणी कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिली. उघड्या मॅनहोलमध्ये पडून ६० वर्षीय अस्लम इसाक शेख यांचा मृत्यू झाला. खासगी कंत्राटदाराकडून सुरू असलेल्या देखभाल कामादरम्यान मॅनहोलचे झाकण उघडे ठेवले होते. त्याचवेळी मोबाईलवर बोलत असलेले शेख यांचा तोल जाऊन ते थेट मॅनहोलमध्ये पडले. साकीनाका घटनेप्रकरणी महापालिकेचे सहाय्यक आयुक्त धनाजी हर्लेकर (एल वार्ड), सहाय्यक अभियंता दीपक चौगुले, कनिष्ठ अभियंता अभिजित चौगुले आणि सहाय्यक अभियंता उत्तम पाटील यांचे निलंबन करण्यात आले आहे. मान्सूनपूर्व बैठकांमध्ये वारंवार आणि स्पष्टपणे हे निर्देश दिले होते की, नाल्यांवरील मॅनहोल सुरक्षित ठेवण्यात यावे. तरीही निष्काळजीपणे काम केले गेले असल्याचे आदेशात म्हटले गेले आहे.

## नागपुरातील हायप्रोफाइल कॅफेवर पोलिसांचा 'दबंग' छापा

**नागपूर :** नागपूर : शहरातील व्हीसीए स्टेडियम परिसरात असलेल्या हॉटेल हेरिटेजमध्ये बुधवारी मध्यरात्री गुन्हे शाखा पोलिसांनी छापा घातला. या छाप्यात 'हाऊस ऑफ बीअर' नावाने असलेल्या कॅफेत मोठ्या प्रमाणावर तरुण-तरुणी हुक्क्याा धूर उडवताना आढळले. त्या सर्वांना ताब्यात घेत पोलिसांनी कॅफेचालक, वेटर, कॅफे कॅप्टन आणि हुक्का सेवन करणारे ग्राहक अशा एकूण ४९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

सदर पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या आणि वेगवेगळ्या विषयाच्या संबंधाने वारंवार चर्चेला येणाऱ्या हेरिटेजमधील या कारवाईमुळे संबंधितांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. उपराजधानीतील बहुचर्चित हॉटेल्सपैकी एक असलेल्या हेरिटेजमध्ये 'हाऊस ऑफ बीअर' या नावाने कॅफे आहे. तेथे बेकायदेशिररित्या ग्राहकांना हुक्का उपलब्ध करून दिला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या आधारे तेथे बुधवारी मध्यरात्री १२.३० वाजता गुन्हे शाखेच्या पथकाने छापा घातला. हॉटेलच्या पाचव्या माळ्यावर पोलिस पोहचले असता तेथे मोठ्या प्रमाणात तरुण-तरुणी हुक्का पिताना आढळले.

## महात्मा फुले वाड्यात वटसावित्री पूजन प्रकरणी निषेध

### खासदारांवर कारवाईची मागणी



**पुणे :** पुणे येथील राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा प्राप्त असलेल्या महात्मा जोतीराव फुले व सावित्रीमाई फुले वाड्यात वटसावित्री पूजन केल्याच्या घटनेचा समता परिषद व फुलेप्रेमींनी तीव्र निषेध केला असून संबंधित लोकप्रतिनिधींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. निषेधकर्त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संविधानाची शपथ घेतलेले लोकप्रतिनिधी महात्मा फुले वाड्यासारख्या राष्ट्रीय स्मारकात जाऊन वटसावित्री पूजन करतात, ही घटना संविधानातील समता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांच्या विरोधात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

समता परिषद व फुलेप्रेमींनी यापूर्वीही प्रशासनाकडे महात्मा फुले वाडा परिसरात अशा प्रकारचे धार्मिक विधी होऊ नयेत, अशी मागणी केली होती. मात्र, त्यानंतरही संबंधित पूजन झाल्याने महात्मा जोतीराव फुले व सावित्रीमाई फुले यांनी प्रतिगामी विचारांविरुद्ध उभा केलेल्या सत्यशोधक चळवळीचा अपमान झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या घटनेची चौकशी करून संबंधित खासदारांवर योग्य ती कारवाई करावी, तसेच राष्ट्रीय स्मारकाचे स्वरूप आणि ऐतिहासिक मूल्य जपण्यासाठी प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत संबंधित खासदार किंवा प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## सत्ता गमावल्यास भाजपचे १० तुकडे होतील : पक्ष फोडणे हेच भाजपचे खरे उद्दिष्ट : संजय राऊत



**मुंबई :** शिवसेना (यूबीटी) खासदार संजय राऊत यांनी गुरुवारी भारतीय जनता पक्षावर हल्लाबोल करत, पक्षांतर आणि विरोधी पक्षांना कमकुवत करण्याचे वेड लागल्याचा आरोप केला.

अलीकडील राजकीय घडामोडींवर प्रतिक्रिया देताना एका पत्रकार परिषदेत बोलताना राऊत म्हणाले की, विरोधी पक्षांमध्ये फूट पाडण्याचे भाजपचे कथित प्रयत्न हे राजकीय संघटना तोडण्याच्या त्यांच्या ध्यासाचे द्योतक आहेत. ते म्हणाले, 'त्यांना (भाजपला) पक्ष तोडण्याचा इतका ध्यास लागला आहे. ते शेवटपर्यंत एकमेकांचे पक्ष असा दावा त्यांनी पुढे केला की, सत्ता गमावल्यास भाजपचे तुकडे होतील. त्यांनी आरोप केला,' मी हे आधीही सांगितले आहेः ज्या दिवशी ते सत्तेतून बाहेर पडतील, त्या दिवशी या केंद्रीय यंत्रणा आमच्या नियंत्रणाखाली येतील. भाजपचे दहा तुकडे होतील. तेही दहा मिनिटांत. दरम्यान, बुधवारी संजय राऊत यांनी विधान परिषद सदस्य (एमएलसी) सचिन अहिर यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. पक्षाचा पाठिंबा मिळूनही लोभामुळे पक्ष सोडल्याचा आरोप त्यांनी केला. एएनआयशी बोलताना राऊत यांनी अहिर यांनी गेल्या काही वर्षांत भूषवलेल्या पदांकडे लक्ष वेधले आणि म्हणाले, 'त्यांना सर्व काही मिळाले आहे. सचिन अहिर एमएलसी, पक्षाचे उपनेते बनले आणि कामगार सेनेचे कार्याध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

# नागपूरमध्ये लॉ युनिव्हर्सिटीत आरक्षणाचे उघड उल्लंघन : डॉ. नितीन राऊत



**नागपूर :** शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांच्या महाराष्ट्रात 'महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी' (MNLU), नागपूरसारख्या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेत पीएचडी प्रवेश प्रक्रियेत आरक्षणाचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहापासून वेगळे पाडण्याचा आणि त्यांच्यावर सामाजिक भेदभाव करण्याचा हा प्रकार अत्यंत लाजीरवाणा असून, याविरोधात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि आमदार डॉ. नितीन राऊत यांनी आज विधिमंडळात प्रशासनाच्या मनमानी कारभाराचा बुरखा फाडला.

### आरक्षणाचे 'तुकडे' करून भेदभाव?

डॉ. राऊत यांनी सभागृहात मांडलेल्या माहितीनुसार, या विद्यापीठाने आरक्षित आणि अनारक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी चक्क दोन वेगवेगळ्या तुकड्या (बॅचेस) तयार केल्या आहेत. ही कृती म्हणजे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सामाजिक भेदभावाच्या खाईत लोटण्यासारखे आहे, अशी जोरदार टीका डॉ. राऊत यांनी केली. पात्र आणि उपलब्ध उमेदवार असतानाही एससी, एसटी, व्हीजेएनटी आणि ओबीसी प्रवर्गातील अनेक उमेदवारांना प्रवेश नाकारून त्यांच्या जागा मुद्दाम रिक्त ठेवल्या जात आहेत. केवळ अनारक्षित प्रवर्गाला झुकते माप देण्यासाठी विद्यापीठ प्रशासन हा मनमानी कारभार करत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

### न्यायालय आणि आयोगाच्या आदेशांना 'केराची टोपली'

या प्रकरणातील प्रशासकीय असंवेदनशीलता उघड करताना डॉ. राऊत म्हणाले की, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने यापूर्वीच प्रशासनाला फटकारून आरक्षणानुसार प्रक्रिया राबवण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. तसेच, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगानेही (NCSC) विद्यापीठाला नोटीस बजावली आहे. असे असतानाही, प्रशासन वारंवार उच्च न्यायालय आणि आयोगाच्या निर्देशांचा अवमान करत आहे. हा प्रकार लोकशाही आणि संविधानाच्या मूल्यांना छेद देणारा आहे. हा विषय विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि सामाजिक सलोख्याशी संबंधित असल्याने, सरकारने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी आग्रही मागणी डॉ. नितीन राऊत यांनी केली. आता यावर राज्य सरकार कोणती भूमिका घेते, याकडे शैक्षणिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### महावितरणमधील 'कंत्राटी गुलामी'वर डॉ. नितीन राऊत आक्रमक

**महावितरणमध्ये सहाय्यक कर्मचाऱ्यांचे शोषण; सभागृहात सरकारला लगावला खडा सवाल**

**मुंबई :** महावितरणसारख्या महत्त्वाच्या सार्वजनिक उपक्रमात काम करणाऱ्या हजारो सहाय्यक कर्मचाऱ्यांचे प्रशासनाकडून पद्धतशीर शोषण केले जात आहे. 'कामगार जीव धोक्यात घालून राबतात, मात्र प्रशासन त्यांना कंत्राटी गुलामीत अडकवून ठेवत आहे,' असा घणाघाती आरोप करत राज्याचे माजी ऊर्जामंत्री आणि ज्येष्ठ आमदार डॉ. नितीन राऊत यांनी विधिमंडळात महावितरणच्या शोषक धोरणांचा बुरखा फाडला. विरारमधील एका २२ वर्षीय विद्युत सहाय्यकाच्या दुर्दैवी मृत्यूनंतरही प्रशासनाला जाग येत नसल्याने डॉ. राऊत यांनी सरकारला धारेवर धरले.महावितरणमध्ये 'उपकेंद्र सहाय्यक' पदाच्या भरतीसाठी जाहिरातीद्वारे आधीच दोन वर्षांचा अनुभव मागितला जातो. स्पर्धेत परीक्षेत व तांत्रिक परीक्षेत निवड झाल्यानंतर या अनुभव असलेल्या उमेदवारांना नियुक्ती दिल्यावर पुन्हा तीन वर्षांच्या कंत्राटी कालावधीवर आणि अत्यंत तुटपुंज्या मानधनावर ठेवले जाते. त्यांच्याकडून नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणेच जोखमीची कामे करून घेतली जातात. हा प्रकार केवळ कर्मचाऱ्यांच्या कौशल्याचा आणि त्यांच्या अनुभवाचा क्रूर अपमान आहे. डॉ. नितीन राऊत यांनी सभागृहात या धोरणाचा निषेध करत, अशा अनुभवी कर्मचाऱ्यांना कोणताही विलंब न करता तात्काळ नियमित सेवेत सामावून घेण्याची ठाम मागणी केली आहे. डॉ. राऊत यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या मुद्द्यांनुसार, उपकेंद्र सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), विद्युत सहाय्यक आणि कार्यालयीन सहाय्यक हे कर्मचारी अहोरात्र, पावसाळ्यात आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात सेवा बजावत आहेत. भरती प्रक्रियेत स्पर्धा परीक्षेद्वारे या सहाय्यक कर्मचाऱ्यांची निवड झाली असता पुन्हा तीन वर्षे कंत्राटी स्वरूपात ठेवल्याने अल्प मानधनामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. तसेच हा तीन वर्षांचा कंत्राटी कालावधी मूळ सेवेत ग्राह्य धरला जात नसल्याने, कर्मचाऱ्यांचे ज्येष्ठता, वेतनवाढ आणि पदोन्नतीचे मोठे नुकसान होत आहे, याकडे डॉ. राऊत यांनी लक्ष वेधले.

PROPERTY FOR RENT/ LEASE
AVAILABLE ON RENT/ LEASE AT PRIME LOCATION
COMMERCIAL PROPERTY
Total Plot Area: 50,000 Sq.Ft.
Constructed Area: 30,000 Sq.Ft.
LOCATION: WELA (HARI), SHANKARPUR ROAD
◆ IDEAL FOR ◆
• Hostel/ Student Accommodation • New College/ Educational Institution • Residential College Campus • Car/ Motorcycle Showroom • Warehouse / Godown • Supermarket (D-Mart Type)
CONTACT
DR. KAMBLE: 9422539451

> “ काळजी केल्याने उद्याचे दुःख कमी होत नाही, ताकद नाहीशी होते... ”


बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA




बहुजन सौरभ **संपादकीय**

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भारतीय राज्यघटना

भारताच्या लोकशाही व्यवस्थेचा पाया भारतीय राज्यघटना आहे. राज्यघटना प्रत्येक नागरिकाला अधिकार प्रदान करते, परंतु त्याचबरोबर प्रत्येक व्यक्ती आणि संस्थेवर कायद्याचे पालन, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची जबाबदारीही टाकते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) संदर्भातील १९४८ ते २०२६ या कालखंडातील घडामोडी या घटनात्मक मूल्यांच्या दृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ मध्ये झाली. सुरुवातीच्या काळात संघाकडे सार्वजनिकरीत्या उपलब्ध अशी लिखित घटना नव्हती. काही इतिहासकारांच्या मते अंतर्गत नियम अस्तित्वात होते, तर काहींच्या मते औपचारिक लिखित घटना नव्हती. परंतु त्याची अधिकृत प्रत सार्वजनिकरीत्या उपलब्ध नसल्याने संघाच्या रचना, उद्दिष्टे आणि कार्यपद्धतीबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत होते. ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधी यांची हत्या झाली. त्यानंतर भारत सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली. न्यायालयात गांधी हत्या कटात संघाचा सहभाग सिद्ध झाला नाही; तथापि, सरकारने सार्वजनिक सुव्यवस्था, गुप्त स्वरूपातील कार्यपद्धती आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव ही कारवाई केली. त्यावेळचे उपपंतप्रधान आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी स्पष्ट अट घातली की, संघाने लिखित घटना स्वीकारून कायद्याच्या चौकटीत कार्य करण्याची हमी दिल्यानंतरच बंदी उठविण्याचा विचार केला जाईल. सरकारने काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले होते-संघाची उद्दिष्टे काय आहेत? संघटनात्मक रचना कशी आहे? अधिकार कोणाकडे आहेत? सदस्यत्वाचे नियम कोणते आहेत? आणि संघ सार्वजनिक उत्तरदायित्व स्वीकारतो का? या प्रश्नांच्या उत्तरादाखल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने लिखित घटना स्वीकारली. त्या घटनेत संघ स्वतःला सांस्कृतिक संस्था म्हणून घोषित करतो. हिंदू समाजाचे संघटन, राष्ट्रीय सेवा, चारित्र्यनिर्माण आणि सामाजिक समरसता ही त्याची उद्दिष्टे असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच संघ स्वतः पक्षीय राजकारणात सहभागी होणार नाही; मात्र स्वयंसेवकांना वैयक्तिकरित्या हिंसा किंवा गुप्त कारवायांवर विश्वास नसलेल्या राजकीय पक्षात सहभागी होण्याची मुभा असल्याचे स्पष्ट करण्यात आले. याच लिखित घटनेच्या आधारे सरकारने पुढे संघावरील बंदी उठविली. त्यामुळे संघाची लिखित घटना ही केवळ अंतर्गत दस्तऐवज नसून भारतीय राज्याने पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाच्या तत्त्वांवर आग्रह धरल्यानंतर तयार झालेला एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तऐवज ठरला. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ नुसार सर्वजण कायद्यापुढे समान आहेत. कोणतीही व्यक्ती, संस्था किंवा संघटना कायद्यापेक्षा श्रेष्ठ असू शकत नाही. अनुच्छेद १९(१)(क) नागरिकांना संघटना स्थापन करण्याचा अधिकार प्रदान करतो. परंतु अनुच्छेद १९(४) नुसार सार्वजनिक सुव्यवस्था, भारताची सार्वभौमता आणि अखंडता यांच्या हितासाठी या अधिकारावर वाजवी निर्बंध घालता येतात. तसेच अनुच्छेद ५१(अ) प्रत्येक नागरिकावर संविधानाचा आदर करणे, राष्ट्रीय एकात्मता जपणे आणि सार्वजनिक जीवनात जबाबदारीने वागणे ही मूलभूत कर्तव्ये सोपवितो. म्हणूनच, लोकशाही व्यवस्थेत कोणतीही संस्था संविधानाच्या चौकटीबाहेर कार्य करू शकत नाही. सुमारे सात दशकांनंतर, २०२६ मध्ये हा प्रश्न पुन्हा चर्चेत आला. कर्नाटकचे गृहमंत्री प्रियांक खरगे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना खुले पत्र लिहून संघाची कायदेशीर नोंदणी, कायदेशीर दर्जा, आर्थिक स्त्रोत, कर अनुपालन आणि उत्तरदायित्वाबाबत माहिती सार्वजनिक करण्याची मागणी केली. या पत्रानंतर देशभरात चर्चा सुरू झाली. समर्थकांनी ही मागणी भारतीय राज्यघटनेतील पारदर्शकता आणि कायद्यापुढील समानतेच्या तत्त्वाशी सुसंगत असल्याचे म्हटले. तर संघाशी संबंधित बाजूने विद्यमान कायद्यानुसार संघावर अशा प्रकारच्या नोंदणीचे बंधन नसल्याचा युक्तिवाद मांडला. त्यामुळे हा विषय सार्वजनिक आणि कायदेशीर चर्चेचा विषय बनला आहे. १९४८ मध्ये सरकारने संघाकडून लिखित घटना मागितली होती. २०२६ मध्ये संघाच्या नोंदणी, कायदेशीर दर्जा आणि उत्तरदायित्वाबाबत प्रश्न उपस्थित झाले. या दोन्ही घटनांमध्ये समान धागा म्हणजे पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कायद्याचे राज्य. भारतीय राज्यघटना प्रत्येक नागरिकाला आणि प्रत्येक संस्थेला समान निकषांवर उभे करते. लोकशाहीमध्ये संस्थांची ताकद त्यांच्या आकारावर नसून त्यांच्या उत्तरदायित्वावर आणि कायद्यावरील निष्ठेवर अवलंबून असते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या इतिहासाकडे पाहताना मतभेद असू शकतात. परंतु घटनात्मक मूल्यांच्या दृष्टीने एक तत्त्व निर्विवाद आहे-भारतीय राज्यघटना सर्वोच्च आहे. कोणतीही संस्था, सामाजिक असो, सांस्कृतिक असो किंवा राजकीय, तिने संविधान, कायद्याचे राज्य, पारदर्शकता आणि सार्वजनिक उत्तरदायित्व यांचा आदर करणे हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे. १९४८ मधील लिखित घटनेची अट आणि २०२६ मधील नोंदणी व पारदर्शकतेची मागणी या दोन्ही घटनांनी भारतीय लोकशाहीसमोर एकच मूलभूत प्रश्न उभा केला आहे-देशातील प्रत्येक प्रभावशाली संस्थेने संविधानाच्या मूल्यांनुसार स्वतःला उत्तरदायी बनविण्याची वेळ आता आली आहे का? या प्रश्नाचे अंतिम उत्तर न्यायव्यवस्था, संसद, कायदे आणि लोकशाही प्रक्रियेतूनच मिळेल. मात्र संविधान सर्वोच्च असल्याचा सिद्धांत हा भारतीय प्रजासत्ताकाचा अविचल पाया राहील.●●

# सिंदूरवाद, दानचोरीने भाजपचा राष्ट्रवाद डागाळला !

**राष्ट्रवाद ही केवळ घोषणा नसते. जनतेचा विश्वास असतो. अन् देशभक्ती ही सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकता असते. ती पारदर्शकता व नैतिकतेतून सिद्ध करावी लागते. राष्ट्रध्वज हातात घेऊन घोषणा देणे सोपे असते. पण राष्ट्राच्या नावावर उभारलेल्या संस्थांमध्ये भ्रष्टाचार नको. हे होऊ न देणे हे खरे राष्ट्रप्रेम असते. अलिकडे भारतीय जनता पक्षाने स्वतःला राष्ट्रवादाचा एकमेव संरक्षक भासविले. विरोधकांवर राष्ट्रविरोधी असल्याचे आरोप केले. त्या राष्ट्रवादाच्या प्रतिमेवर आता अनेक प्रश्नचिन्हे निर्माण झाले. त्यात पहलगाम दहशतवादी हल्ला आहे. ऑपरेशन सिंदूर आहे. आता अयोध्येतील राम मंदिरातील दानचोरी आहे. जमीन व्यवहारांतील आरोप आहेत. यामुळे भाजपचा राष्ट्रवाद डागाळला आहे.**




भाजपने स्वतःची राजकीय ओळख विकास, राष्ट्रवाद, सांस्कृतिक पुनर्स्थापना आणि नैतिक नेतृत्वावर उभी केली. विकासाला घोटाळे, पेपरफुटीचे ग्रहण लागले. नैतिक नेतृत्वाला आयाराम, गयाराम, वाशिंग मशीनची किड लागली. सांस्कृतिक आंदोलनाला दानचोरीची काजळ बसली आणि आता राष्ट्रवाद पहलगाम, सिंदूरबाबत विसंगत विधानाने डागाळले. राजकीय नुकसान केवळ विरोधकांच्या आरोपांमुळे होत नाही. ते लोकांच्या मनात निर्माण होणाऱ्या अस्वस्थतेमुळे होते. कारण लोक विचारतात. ज्यांनी आम्हाला इतिहासाची आठवण करून दिली. ते वर्तमानाला सामोरे जातील का? ज्यांनी राष्ट्रवाद शिकवला. ते पारदर्शकतेचीही तितकीच भाषा करतील का? मंदिर हे कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचे केंद्र आहे. देशभरातील लाखो भाविकांनी आपल्या कष्टाच्या कमाईतून देणग्या दिल्या. काही वृद्धांनी आयुष्यभराची पुंजी दिली. या देणग्या श्रद्धा, विश्वास आणि भावनांचे प्रतिक होत्या. मात्र जून २०२६ मध्ये मंदिरातील दानपेट्यांतील रकमेच्या अपहाराचे प्रकरण समोर आले. ट्रस्टच्या तक्रारीनंतर विशेष तपास पथकाची स्थापना झाली. काही कर्मचाऱ्यांना अटक झाली. त्यांच्याकडून मोठी रक्कम जप्त केली. विविध स्तरांवर कोट्यवधी रुपयांच्या अपहाराचे आरोप झाले. या आरोपांनी जनमानसाला मोठा धक्का बसला. श्रद्धेच्या नावाने जमा झालेल्या देणग्यांच्या सुरक्षिततेवर प्रश्न निर्माण झाला. मग सामान्य नागरिकांनी कोणावर विश्वास ठेवायचा? ही घटना नैतिक अधःपतनाची आहे. यापूर्वीही राम मंदिरासाठी जमीन खरेदीतील कथित अनियमिततेचे आरोप झाले. काही जमिनी कमी किंमतीत खरेदी करून काही अवधीत ट्रस्टला अधिक किंमतीत विकल्याचा आरोप विरोधकांनी केला. त्याचा अंतिम निष्कर्ष अद्याप आलेला नाही. तोच दान घोटाळा उजेडात आला. देशात धर्माच्या नावावर सत्ता, राष्ट्रवादाच्या नावावर मौन. हे चालणार नाही. लोकांनी दान दिले. समर्थन दिले. तेव्हा त्यांना वाटले इथे नैतिकता असेल. इथे आदर्श असेल. पण आता प्रश्न विचारले जाऊ लागलेत. देवाच्या दानात चोरी कसी झाली? दानात आलेल्या मौल्यवान विटा कुठे गेल्या? जमिनीचे घोटाळे कसे झाले? आणि मंदिराचे राजकारण करणारे मौन कसे? दान व्यवस्थापनावर चर्चा होते. जमीन व्यवहारांवर प्रश्न उपस्थित होतात. पारदर्शकतेबाबत शंका निर्माण होते. तेव्हा तो नैतिकतेचा विषय बनतो. कारण मंदिराला लोकांनी पैसा दिला. प्रश्न हा नाही की आरोप खरे आहेत की खोटे? तो तपासाचा विषय आहे. प्रश्न हा आहे की आरोप आले तर सत्तेची प्रतिक्रिया काय असते? चौकशी होते का? उत्तर दिले जाते का? की प्रश्न विचारणाऱ्यालाच धर्मविरोधी, राष्ट्रविरोधी ठरवले जाते? हेच भारतीय लोकशाही समोरचे सर्वात मोठे संकट आहे.

इतिहासाची भाषा वापरली जाते. मोगल आले. त्यांनी आक्रमणे केली. मंदिरे लुटली. हा इतिहास प्रचारक रंगवून सांगतात. त्यांचे पक्ष त्या इतिहासाचे राजकारण करतात. त्यांनी वर्तमानात नैतिकता गहाण ठेवायची? हे कसे चालेल? काल मंदिर लुटणारा आक्रमक होता. लुटारू होता. तेवढेच चढावा, दानचोर लुटारू आहेत. कारण अपराधाचा रंग नसतो. त्याला धर्म नसतो. त्याला पक्ष नसतो. ज्यांनी वर्षानुवर्षे देशाला नैतिकतेचे धडे दिले, संस्कारांची भाषा केली. राष्ट्र प्रथम असे सांगितले. त्यांच्याशी संबंधित व्यक्ती किंवा व्यवस्थेवर प्रश्न आले तर मग नैतिकतेचे निकष कसे बदलतात? सामान्यांसाठी कायदा आणि प्रभावशालींसाठी मौन. ही व्यवस्था लोकशाहीला शोभत नाही. राम हे हिंदू संस्कृतीत सत्य, मर्यादा, न्याय आणि त्यागाचे प्रतिक आहेत असे सांगावयाचे. दुसरीकडे त्यांच्या नावावर उभारलेल्या मंदिरा सभोवार आर्थिक गैरव्यवहारांचे आरोप निर्माण झाले. ही नैतिक वेदना आहे. श्रद्धा ही एकदा तुटली की ती पुन्हा निर्माण करणे अत्यंत कठीण असते. आज राजकीय आरोप-प्रत्यारोपांची गरज नाही. तर संपूर्ण सत्य जनतेसमोर आणण्याची आहे. दानाचा प्रत्येक रुपया कुठे गेला? जमीन व्यवहार कसे झाले? दोषी कोण आहेत? त्यांच्यावर काय कारवाई झाली? याचे स्पष्ट उत्तर देशाला मिळाले पाहिजे. दोषींवर कठोर शिक्षा झाली पाहिजे. त्यातून मोठे मासे सुटता कामा नये. राष्ट्रवादाची प्रतिष्ठा उत्तरदायित्वाने टिकते. राम मंदिर हे कोणत्याही एका पक्षाचे नाही. त्या श्रद्धेवर संशयाची सावली पडणे. ही चिंतेची बाब आहे. आज प्रश्न केवळ दानचोरीचा नाही, केवळ जमीन व्यवहारांचा नाही. राजकारणाचाही नाही. प्रश्न आहे विश्वासाचा. श्रद्धा, सत्य आणि राष्ट्रवादाचा आहे. या तिन्हींचा पाया जर पारदर्शकतेवर नसेल, तर कितीही मोठ्या घोषणा दिल्या तरी त्या जनतेच्या मनात टिकत नाहीत. राष्ट्रवादाचा खरा रंग सैनिकांच्या बलिदानात असतो. नागरिकांच्या प्रामाणिकपणात आणि सार्वजनिक जीवनातील स्वच्छतेत असतो. जर श्रद्धेच्या नावावर उभारलेल्या संस्थांवरच संशयाची छाया पडत असेल, तर तो डाग कोणत्याही घोषणेने धुतला जात नाही.

राष्ट्रवादाची खरी कसोटी सैनिकांप्रती असलेल्या प्रामाणिकपणात असते. पहलगामच्या घटनेनंतर देशात संतापाची लाट उसळली. त्यानंतर ऑपरेशन सिंदूरचे मोठ्या प्रमाणावर राजकीय आणि भावनिक चित्र उभे करण्यात आले. मात्र त्यानंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. देशाचे संरक्षण मंत्री राजनाथसिंग यांनी संसदेला माहिती दिली. तो दिवस २८ जुलै २०२५ होय. त्यात सरकारची पाठ थोपाटून घेतली. सहा जवान शहिद झाले. ही माहिती लपविली. हा विरोधकांचा आरोप आहे. तेरा महिन्यानंतर त्या सहा शहिदांच्या स्मारकाबाबतची बातमी आली. तिने देशभर खळबळ उडाली. यातून राष्ट्रवाद हा पारदर्शकतेवर उभा राहतो की खोट्या राजकीय प्रचारावर असा प्रश्न अधिक तीव्र झाला. देशभक्तीचा अर्थ सरकारवर प्रश्न विचारू नये असा नाही. उलट लोकशाहीत प्रश्न विचारणे हीच खरी देशभक्ती आहे. कारण सरकार देश नसते. सरकार बदलते. पण देश कायम राहतो. देशात राष्ट्रवादाची भावना प्रबळ करण्यात आली. सैनिक, सीमा, त्याग, शौर्य यांची भाषा जनमानसात रुजवली गेली. राष्ट्रवाद म्हणजे पोकळ घोषणाबाजी नाही. राष्ट्रवाद म्हणजे सत्याशी निष्ठा हवी. राष्ट्रीय सुरक्षेवर सरकारची विसंगत विधाने नकोत. सैनिकांचा सन्मान हा राजकीय प्रचाराचे साधन होऊ नये. आज लोक बदलले. आता पुरावे मागितले जातात. पूर्वी भावना पुरत होत्या. आता उत्तरदायित्व मागितले जाते. पूर्वी मंदिर पुरेसे होते. आता व्यवस्थेचा हिशेब मागितला जातो. लोकांचा राग श्रद्धेचा वापर करणाऱ्यांवर आहे. लोकशाहीत जनता मंदिरापेक्षा मोठी असते. कारण जनता प्रश्न विचारते. प्रश्न विचारणारी जनताच राष्ट्राची खरी शक्ती असते.●●




भूपेंद्र गणवीर
मो. 9850031019


# अष्टपैलू रिपब्लिकन नेते ठ. रा. पाडळे

**डॉ. बाबासाहेबांचे एकनिष्ठ अनुयायी, आंबेडकरी चळवळीतले ज्येष्ठ नेते, स्वातंत्र्यसैनिक, पुणे शहराचे पहिले उपमहापौर, नागपूरच्या धम्मदीक्षा समारंभाचे साक्षीदार, पुण्यश्लोक ठकसेन राघोबा पाडळे यांची 2 जुलै 2026 रोजी 106वी जयंती त्यानिमित्ताने...**

त्यांच्या कार्याचा वारसा आजही सामाजिक बांधिलकी, प्रामाणिक नेतृत्व आणि मानवसेवेची प्रेरणा देणारा आहे. ठ. रा. पाडळे यांचा जन्म २ जुलै १९२० रोजी अहमदनगर येथे अत्यंत गरीब कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांनी दारिद्र्य, अस्पृश्यता आणि सामाजिक अन्याय यांचे चटके सोसले. या संघर्षमय जीवनाचे जिवंत चित्रण त्यांच्या अप्रकाशित 'वज्रमूठ' या आत्मचरित्रात आढळते. लहानपणीच्या कठीण परिस्थितीने त्यांना खचवले नाही, उलट समाजासाठी झटण्याची प्रेरणा दिली. त्यांचे राहणीमान अत्यंत आधुनिक होते. डोक्यावर हॅट, हातात काठी आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व ही त्यांची ओळख होती. मराठी, हिंदी, इंग्रजीबरोबरच मल्याळम, तामिळ, तेलुगू आणि अरबी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या कार्यासाठी संपूर्ण आयुष्य वाहून घेतले. ब्रिटिश काळात त्यांनी लष्करात सेवा बजावली. दुसऱ्या महायुद्धा दरम्यान इजिप्त, इराण, फ्रान्स आणि ब्रिटन या देशांना भेट देण्याची संधी त्यांना मिळाली. या अनुभवामुळे त्यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक झाला. १९४९ मध्ये ते शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे पुणे जिल्हाध्यक्ष झाले. असिस्टंट रिक्रुटिंग ऑफिसर म्हणून अनेक होतकरू युवकांना लष्करात भरती करून त्यांचे आयुष्य घडवले. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करणे, सामाजिक संस्थांमध्ये कार्य करणे आणि गरजूंच्या अडचणी सोडवणे हे त्यांचे जीवनकार्य होते. त्यांनी स्काऊट-गाईडचे अध्यक्ष, डी.सी. मिशनचे सदस्य तसेच ससून आणि मेंटल हॉस्पिटलच्या व्हिजिटर्स कमिटीवरही उल्लेखनीय सेवा बजावली. सुमारे चार दशके त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय राहून लोकसेवा केली. त्यांचे कार्य कोणत्याही एका समाजापुरते मर्यादित नव्हते. सर्व जातीधर्मातील लोकांशी त्यांनी स्नेहाचे संबंध ठेवले. राजकारणात असूनही पदाचा मोह न बाळगता लोकाभिमुख नेतृत्व त्यांनी जपले. पुणे महानगरपालिकेचे ते तब्बल २७ वर्षे सदस्य राहिले. डॉ. ना. भि. परुळेकर आणि वा. रा. कोठारी यांच्या प्रयत्नातून त्यांना पुणे शहराच्या पहिल्या दलित उपमहापौरपदाचा मान मिळाला. उपमहापौर असताना नगरकर महाराजांनी त्यांना ज्ञानेश्वरीची प्रत भेट देऊन हत्तीवरून मिरवणूक काढली होती. हा त्यांच्या सामाजिक स्वीकाराचा आणि कार्याचा मोठा सन्मान होता. 'वज्रमूठ' आत्मचरित्रात त्यांनी १९५२ हे वर्ष आयुष्यातील सर्वात महत्त्वाचे ठरल्याचे नमूद केले आहे. पेशवाईच्या पुण्यात एका अस्पृश्य समाजातील व्यक्तीला नगरसेवक म्हणून काम करण्याची संधी मिळणे हा स्वतःचा नव्हे, तर जनतेचा सन्मान असल्याचे ते सांगतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील भीमसैनिक म्हणून समाजसेवेची खरी दिशा मिळाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. बोपोडीतील असंख्य कार्यकर्ते, मित्र आणि सहकाऱ्यांनी निवडणुकीत केलेल्या सहकार्याची आठवण ते कृतज्ञतेने व्यक्त करतात. त्या काळातील कार्यकर्त्यांमधील एकजूट, त्याग आणि समर्पणाची तुलना करताना आजच्या फूट आणि स्वार्थी राजकारणाबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली आहे. पुणे महानगरपालिकेतील त्यांच्या कार्यकाळात अनेक राष्ट्रीय नेत्यांशी त्यांचा संपर्क आला. भारताचे उपराष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू, जयप्रकाश नारायण आणि श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पुणे भेटीदरम्यान त्यांनी बौद्ध समाजाच्या प्रश्नांबाबत निवेदने सादर केली. पुण्यात रिपब्लिकन ऐक्यासाठी त्यांनी गाडगे महाराज धर्मशाळेत भव्य मेळावा आयोजित करून सामाजिक सलोख्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासाने पाडळे गुरुजींच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली. २५ डिसेंबर १९५४ रोजी देहूरोड येथे डॉ. बाबासाहेबांनी भारतातील पहिल्या बुद्धमूर्तीची स्थापना केली आणि १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर झालेल्या ऐतिहासिक धम्मदीक्षा सोहळ्याचे ते प्रत्यक्ष साक्षीदार होते. गोवा मुक्ती आंदोलनातही त्यांनी सहभाग घेतला. पुण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यासाठी स्थापन झालेल्या स्मारक समितीचे ते अखेरपर्यंत अध्यक्ष राहिले. १९५८ मध्ये त्यांनी महानगरपालिकेत पुतळ्याचा प्रस्ताव मांडला. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे २६ जानेवारी १९६० रोजी डॉ. बाबासाहेबांचा भव्य ब्राँझचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला. न्यायमूर्ती गजेंद्र गडकर यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. भारतातील डॉ. बाबासाहेबांचा हा पहिला ब्राँझचा पूर्णाकृती पुतळा मानला जातो. तसेच चिखलवाडी येथे साध्वी रमाबाई आंबेडकर यांच्या नावाने प्राथमिक शाळा उभारण्यातही त्यांनी मोलाचे योगदान दिले. सतत पाच वेळा पुणे महानगरपालिकेवर निवडून आल्याबद्दल १९७८ मध्ये त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांनी हा सन्मान जनतेच्या प्रेमाचा असल्याचे सांगत लोकसेवेचीच खरी कमाई असल्याचे नमूद केले. स्वातंत्र्य सैनिक म्हणून त्यांना सन्मान आणि पेन्शन मिळाली. १९८१ मध्ये महाराष्ट्र शासनाने डॉ. शंकरदयाल शर्मा यांच्या हस्ते त्यांना 'दलितमित्र' पुरस्कार देऊन गौरविले. प्रसिद्ध समाजसेवक भाई वैद्य यांच्या हस्ते त्यांचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. त्याचवर्षी ३० ऑक्टोबर १९९५ रोजी त्यांचे परिनिर्वाण झाले. अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी मानवता, समता आणि सामाजिक न्यायासाठी कार्य केले. त्यांच्या पश्चात पत्नी मालन, एक मुलगा आणि तीन मुली असा परिवार आहे. मुलगा उल्हास पाडळे सेवानिवृत्त असून त्यांच्या कार्याचा वारसा आजही स्मरणात आहे. ठ. रा. पाडळे हे केवळ राजकारणी नव्हते, तर समाजाला दिशा देणारे निष्ठावान कार्यकर्ते, डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे खरे अनुयायी आणि लोकहिताला आयुष्य अर्पण करणारे जन नेते होते. त्यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन. त्यांचे कार्य आणि विचार नव्या पिढीला समाजसेवा, समता आणि मानवतेचा मार्ग दाखवत राहतील, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. ●●









मिलिंद मानकर
मो. 8177866397


# मी जबाबदारी स्वीकारतो आपणही स्वीकारा...




## अनुभव

आंदोलने आंबेडकरी चळवळीसाठी नवीन नाहीत.. रोज नवीन मुद्दे समोर येतात. त्या मुद्द्यांना न्याय मिळण्यासाठी समाज तन मन धनाने रस्त्यावर उतरतो. काही लोक ज्यांना त्या मुद्द्याची गंभीरता जास्त वाटते. ते लोक पुढाकार घेऊन जनमानसात त्या मुद्द्याची जनजागृती करून लढा उभारण्याचा प्रयत्न करतात.. हे करीत असतांना बरेचदा विषय हा एका संघटनेचा न ठेवता समाजाचा बनवितात जेणेकरून संपूर्ण समाज हा त्या मुद्द्यावर एकत्रित येऊन संघर्ष करेल. पुढाकार घेणारे महिन्या भरापासून त्या मुद्द्यावर अथक परिश्रम करतात. मुद्द्याची जनजागृती विविध माध्यमातून केल्या जाते. त्यात विशेषकर इलेक्ट्रॉनिक मीडिय, प्रिंट मीडिया, सोशल मीडिया तसेच लोकांपर्यंत प्रत्यक्षात पोहचून जनजागृती करणे, बैठकी बोलाविणे इत्यादी गोष्टी केल्या जातात. मुद्दा समाजातील जवळपास सर्वांपर्यंत पोहचतो. सर्वांना दिनांक, वेळ, स्थळ याची माहिती झालेली असते. ज्या दिवशी आंदोलन असते त्या दिवशी बरेच लोक आंदोलनात सहभागी सुद्धा होतात. पण पाहिजे त्या प्रमाणात नाही. 100 टक्क्यांपैकी 40 टक्केच लोक म्हटले तरी चालेल आणि शोकांतिका अशी त्या 40 टक्के लोकांमध्ये एकटे 70 टक्के लोक वयाने 50 च्या वर आणि 85 च्या खालचे असतात, ही वस्तुस्थिती आहे. मग प्रश्न पडतो की काय आजच्या तरुणाला चळवळ माहिती नाही. त्याने कधी डॉ. बाबासाहेब वाचला नाही. त्याने कधी सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतला नाही. केवळ आंबेडकर जयंती आणि धम्मचक्र प्रवर्तन दिन हे सण म्हणूनच साजरे केले. अतिउत्साही होऊन त्याने जयंतीची मोठी मिरवणूक काढली किं तो सहभागी झाला. कदाचित यालाच तो चळवळ तर नाही समजला असे अनेक प्रश्न याठिकाणी उपस्थित होतात. असाच प्रश्न आज दि. 1 जुलै 2026 ला दीक्षाभूमीच्या लागतची कृषी विभागाची जागा मिळणे संदर्भात भर पावसात झालेल्या आंदोलनात अनुभवास आली. सकाळी 11 वाजता साखळी आंदोलन सुरू झाले. तेव्हा नुकताच पाऊस सुरू झाला. 11 वाजता थोडे कमी लोक होते. पण 12 वाजतापर्यंत लोकांची संख्या वाढली आणि इकडे पावसाचा जोर सुद्धा वाढला. लोकांनी साखळी बनविली दीक्षाभूमी काचीपूरा चौक पर्यंत पाऊस जोरात होता. मी जेव्हा साखळी बनून उभे राहिलेले लोक पाहत गेलो तेव्हा मला माझीच चीड आली. कारण त्या ठिकाणी 80 टक्के लोक हे वयाने 50 च्या वरचे होते. 70 ते 80 वयाचे वृद्ध मोठ्या प्रमाणात. त्यात सर्वात जास्त महिला होत्या. काही लोकांच्या हाती छत्र्या होत्या पण काही ओले होत होते, पाऊस जोराचा . 80 वर्षाची आजी ओली होताना पाहिले तेव्हा एकवेळ मन भरून आले व लगेच प्रश्नही पडला की ज्या वयात या आजीला आरामाची गरज आहे त्या वयात एवढ्या भर पावसात ओली होत आंदोलनात सहभाग देत आहे आणि त्याच धर्तीवर समाजातील बहुतांश युवा याठिकाणी दूरवर दिसत नाही. आंदोलन म्हटले की तिथे सर्वात जास्त युवांची गरज असते. पण त्याठिकाणी या म्हाताऱ्यांनी धुरा सांभाळली आहे. शोकांतिका.. आज या युवांना महापुरुषांची विचारधारा माहिती नसल्याने किंवा कोणी त्यांच्यापर्यंत ती पोहचवू शकले नसल्यामुळे कदाचित या युवाला आंदोलनाचे गांभीर्य नाही. हा 14 एप्रिलला डीजेवर नाचणे व धम्मचक्र प्रवर्तन दिनाला मसालेभात वाटणे यालाच चळवळ समजुन बसला आहे. या युवांच्या भरकटलेल्या परिस्थितीला कोणी जबाबदार असेल तर सर्वप्रथम मी आहे. मला चळवळ समजली पण मी यांच्यापर्यंत ती पोहचवू शकलो नाही हा माझा गुन्हा आहे. मी जबाबदारी स्वीकारतो. त्याचबरोबर चळवळीतील प्रत्येकाने ही जबाबदारी स्वीकारणे काळाची गरज आहे. आम्हाला या युवांपर्यंत महापुरुषांची विचारधारा पोहचविणे गरजेचे आहे. यांना प्रबोधन तसेच कॅडर देणे गरजेचे आहे. तेव्हाच हा युवा भर उन्हात किंवा पावसात माझी जबाबदारी म्हणून नक्कीच सहभागी होईल.●●


आशिष फुलझेले
मो. ९८५०३५७१७६


# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत कार्यकर्ता
# ॲड. बिहारी कांबळे




बिहारी कांबळे यांचा जन्म ब्रम्हपुरी तालुक्यातील नान्होरी गावात 2 जुलै 1926 रोजी वडील रामजी आणि आई मैनाबाईच्या पोटी झाला. त्याला दोन भाऊ आणि तीन बहिणी होत्या. त्याचे प्राथमिक शिक्षण नान्होरितच झाले. मॅट्रिक ब्रम्हपुरी येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. पुढे ते नागपूर येथे शिकायला मॉरिश कॉलेज मध्ये गेले आणि त्यानंतर त्यांनी एलएलबी देखील नागपूर मध्येच केले. नागपूर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचे केंद्र असल्याने आणि त्यांना सामाजिकतेची जाण असल्याने विद्यार्थीदशेतच असतांना त्याचे संबंध बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे सोबत आले आणि त्यांनी सामाजिक चळवळीत सहभाग घेतला. पाहता, पाहता त्याची चांगली मैत्री झाली. ॲड. बिहारी कांबळे यांनी एलएलबी चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर चंद्रपूर येथे वकिलीचा व्यवसाय सुरु केला. रामजी कांबळे हे श्रीमंत होते तरीही अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागत होते. त्यामुळे त्यांनी आपल्या मुलाला म्हणजे बिहारी आणि भावाच्याही मुलाला शिक्षणासाठी नागपूरला पाठविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सानिध्यात बिहारी कांबळे यांचे वडील आल्यामुळे त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल, त्यांच्या चळवळीबद्दल समजून घेता आले. रामजी कांबळे यांनी अस्पृश्य समाजातील खेड्यापाड्यातील लोकांना मेलेले गुरे, ढोरे ओढू नका, मेलेल्या जनावरांचे मांस खाऊ नका, मुलांना शिक्षण द्या, असा प्रचार आणि प्रसार केला. बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी चंद्रपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरीयल संस्था स्थापन केली होती. त्याचे ॲड. बिहारी कांबळे संस्थापक सदस्य होते. सोबतच ते ब्रम्हपुरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था याचेही संस्थापक सदस्य होते. त्याच बरोबर ते नान्होरी येथील सिद्धार्थ शिक्षण संस्थाचे ते संस्थापक अध्यक्ष होते. ॲड. बिहारी कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबईमध्ये झालेल्या जुलै 1924 मधील बहिष्कृत हितकारणीच्या एका सभेत दिलेला संदेश म्हणजे, "शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा" हा शीर सावध मानून त्यानी हायस्कूल काढली, कॉलेज काढले, आणि खेड्यापाड्यात जाऊन अस्पृश्य समाजाला शिक्षणाचे महत्व सांगितले आणि स्वाभिमान शिकविला. त्याच बरोबर त्यानी 1954 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर भंडारा मतदार संघामधून शेड्युल कास्ट फेडरेशनच्या वतीने लोकसभाची निवडणूक लढवीत होते, त्यावेळी बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे आणि बॅरि. बिहारी कांबळे यांनी धुरा सांभाळली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रचाराला येणाऱ्या शेड्युल कॉस्ट फेडरेशनच्या नेत्याच्या आणि कार्यकर्त्यांच्या जेवणाची व राहण्याची व्यवस्था ॲड. बिहारी कांबळे साहेब यांनी नान्होरी येथे केली होती. वडसा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रचार सभेच्या आयोजनात पुढाकार घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राहण्याची व्यवस्था व्हावी यासाठी श्रीराम जाणी यांच्या वाड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विशेष सोय व्हावी यासाठी ॲड. बिहारी कांबळे यांनी काळजी घेतली. त्यावेळी मात्र काँग्रेसच्या सर्व लोकांनी सरकारी रेस्ट हाऊस बुक करून ठेवले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा केवळ 10925 मतांनी पराभव झाला होता. बॅरि. खोब्रागडे साहेब आणि ॲड. बिहारी कांबळे साहेब भरपूर मेहनत घेतली. पण काही लोकांनी बेईनामी केल्यामुळे डॉ. बाबासाहेब निवडणूक जिंकू शकले नाही. हे शल्य ॲड. बिहारी कांबळे यांना होते. त्यामुळे ते 1962 ला केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परभवाचा बदला घेण्यासाठी 1962 ला काँग्रेसच्या बाळकृष्ण वासनिकच्या विरोधात ॲड. बिहारी कांबळे हे स्वतः भंडारा लोकसभामधून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाकडून उभे राहिले होते. पण केवळ तीन हजार मतांनी ॲड. बिहारी कांबळे यांचा पराभव झाला होता. त्यांनी प्रजासत्ताक मुखपत्र रिपब्लिकन पक्षाचे म्हणून चंद्रपूरमधून सुरु केले. त्यावेळी हिंदू धर्माचे शंकराचार्य यांच्या संदर्भात माहिती प्रसिद्ध केल्यामुळे त्यांना तुरुंगावास झाला होता. नामांतर आंदोलन, भूमिहीन सत्याग्रह, नान्होरी येथील रामदहन कार्यक्रम यामुळे त्यांना तुरुंगात जावे लागले. पण त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला सातत्याने शेवटच्या क्षणापर्यंत पुढे नेण्याचा प्रयत्न केला, बुद्ध विचार लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. त्यांचे नाव चंद्रपूर जिल्ह्यापुरते मर्यादित नाही तर संपूर्ण विदर्भात आणि महाराष्ट्र मधेही सन्मानपूर्वक घेतल्या जाते. हजारो विद्यार्थी वकील, डॉक्टर, प्राध्यापक, इंजिनिअर, ऑफिसर त्याच्या शाळेमधून, कॉलेज मधून झालेली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चंद्रपूर येथे धम्मदिक्षा दिली. त्या कार्यक्रमात देखील त्यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. बुद्ध विचार ते सातत्याने लोकांना सांगत असत. ॲड. बिहारी कांबळे सरांना 2 जुलै 2026 रोजी 100 वर्ष पूर्ण होत आहेत. शताब्दी वर्षानिमित्याने त्याच्या कार्याला सन्मानपूर्वक जयभीम. ●●




अविनाश टिपले
मो.9970917389

## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - १९२

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा महाकाळी. जि. वर्धा



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा गावातील मुख्य चौकात असून येथिल लोक येथे एकत्र येतात. दिनविशेष कार्यक्रम आयोजित करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशानुसार येथिल लोक शिक्षण घेऊन संघटित आहेत. येसगाव हे चळवळीचे ठिकाण आहे.

संवाद मित्र, राजू थुल
मो. 9423420031

## महत्वाचे

### आज SIR प्रक्रियेबाबत जनजागृती कार्यशाळा




**नागपूर :** मजबूत लोकशाहीसाठी सजग आणि सक्रिय नागरिक असणे गरजेचे आहे, त्या करिता बानाई, बाहो आणि महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमच्या वतीने दि.३ जुलै २०२६ ला सायं. ५.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, ऊरुवेला कालनी, नागपूर येथे SIR प्रक्रिया (मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण) बाबत जनजागृती कार्यशाळेचे आयोजन केले आहे. संविधान जागर अभियान टीम प्रशिक्षक आहेत. या कार्यशाळेत नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमचे महासचिव सच्चिदानंद दारूंडे, बानाईचे अध्यक्ष इंजि.अरविंद गेडाम, बाहोचे डॉ. सुचित बागडे यांनी केले आहे.

## वटपौर्णिमेला अंनिस तर्फे वडाच्या झाडाचे वृक्षारोपण



**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने वटपौर्णिमेच्या दिवशी प्रतापनगर येथील बुद्ध विहारात वडाच्या झाडाच्या रोपट्याचे वृक्षारोपण सुप्रसिद्ध लेखक, कवी व समिक्षक डॉ. प्रकाश राठोड यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी म. अंनिसच्या नागपूर शहर कार्याध्यक्षपदी मालती वराडे, दत्तात्रयनगर शाखेच्या कार्याध्यक्षा सुधा बामनपल्लीवार, प्रधान सचिव रंजना कोल्हे, दैनिक बहुजन सौरभचे कार्यकारी संपादक विलास गजभिये, राम घोडेस्वार, दिनकर मडकवाडे उपस्थित होते. यावेळी डॉ. प्रकाश राठोड यांनी वटवृक्षाचे महत्व सांगून त्याचा व स्त्रीशक्ती यांचा नैर्सगिक अनुबंध स्पष्ट केला. यावेळी अन्य मान्यवरांनीही आपले मनोगत व्यक्त केलेत.

## भांडुप धम्म उपासिका संघातर्फे राजर्षी शाहू महाराजांची जयंती साजरी



**मुंबई :** भांडुप धम्म उपासिका संघाच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. धम्म उपासिका चंद्रकला सागर तायडे यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजर्षी शाहू महाराजांची जयंती दिवाळीप्रमाणे आनंदात व उत्साहात साजरी करण्याचे केलेले आवाहन स्मरणात ठेवत त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमात सुषमा संजय वाकोडे, तुळसाबाई गोविंदा इंगळे, ज्योती दिलीप थाटे, अनिता गवई, सुनिता उदेभान तायडे, चंद्रकला सागर तायडे, नंदा शिंदे आणि कोकिळा महादेव बांगर यांनी सहभाग घेत राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणविषयक कार्याचा गौरव केला.

## नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालया तर्फे नवागतांचे स्वागत



**कुरखेडा :** शाळेत नव्याने भरती झालेले नवागत असतात. त्यांचे स्वागत करण्यासाठी शाळेच्या पहिल्या दिवसानिमित्त नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालय देऊळगाव येथे कुरखेडा तालुक्यात येणाऱ्या जि.प. प्रा.शाळा येतील विद्यार्थांना सन्मानपूर्वक बोलावून वाचनालयाच्यावतीने पुष्पगुच्छ, शालेय साहित्य, खाऊ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले व शाळेच्या पहिल्या दिवसानिमित्त नवागतांना तसेच उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. त्या शुभप्रसंगी नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालयाच्या सदस्या निर्मला ठलाल, जि.प.प्रा.शाळेचे मुख्याध्यापक कोसरे तसेच सामाजिक कार्यकर्त्या संगीता संतोष ठलाल प्रामुख्याने उपस्थित होते.

# ज्येष्ठ पत्रकार तुळशीदास भगवंत (टी.बी.) गोल्हर यांचे निधन



**नागपूर :** नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तथा टिळक पत्रकार भवन ट्रस्टचे माजी अध्यक्ष, नागपूर येथील युएनआयचे दीर्घकाळ ब्युरो चीफ राहिलेले ज्येष्ठ पत्रकार तुळशीदास भगवंत गोल्हर यांचे गुरुवारी पहाटे निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८६ वर्षे होते. त्यांच्या निधनामुळे पत्रकारिता क्षेत्रात हळहळ व्यक्त होत असून, एक अनुभवी, अभ्यासू आणि तत्त्वनिष्ठ पत्रकार हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

मूळचे माणिकवाडा (धनज), ता. नेरपरसोपंत, जि. यवतमाळ येथील असलेले गोल्हर यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात अनेक दशकांपर्यंत उल्लेखनीय कार्य केले. त्यांनी आपल्या निर्भीड लेखणी, सामाजिक बांधिलकी आणि पत्रकारितेतील निष्ठेमुळे पत्रकार विश्वात मानाचे स्थान निर्माण केले होते. नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष तसेच टिळक पत्रकार भवन ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून त्यांनी पत्रकारांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

नागपूर विद्यापीठाच्या जनसंवाद विभागातून त्यांनी पत्रकारितेतील सुवर्णपदक प्राप्त केले होते. विधी विभागात पदव्युत्तर शिक्षण त्यांनी घेतले होते. नागपूर टाइम्समध्ये त्यांनी काही काळ पत्रकारिता केली. त्यानंतर नवी दिल्ली येथे सर्वोच्च न्यायालयात यूएनआयचे विधी वार्ताहर म्हणून त्यांनी काम केले आहे. याशिवाय नागपूर येथे युएनआयचे ब्युरोचीफ म्हणून दीर्घकाळ त्यांनी काम केले आहे. नागपूर विद्यापीठात जनसंवाद विद्या विभागामध्ये त्यांनी नव्या पिढीला मार्गदर्शक म्हणूनही काम केले आहे.

त्यांच्या पार्थिवावर अंबाझरी घाट, नागपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी कोकिळा, अमेरिकेत स्थायिक झालेले त्यांचे जेष्ठ चिरंजीव राहुल गोल्हर, स्नुषा श्वेता गोल्हर,डॉ. संदीप गोल्हर, स्नुषा श्वेता गोल्हर आहेत. ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ केशवराव गोल्हर हे त्यांचे कनिष्ठ बंधू आहेत. याशिवाय कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच बराच मोठा परिवार आहे. तुळशीदास गोल्हर यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्रातील एक ज्येष्ठ, अनुभवी व मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले असून, विविध स्तरांतून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# उपवर्गीकरण व क्रिमीलेअर विषयावरील जनजागृतीसाठी ग्रंथ उपलब्ध




**नागपूर :** अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरण आणि क्रिमीलेअर या विषयावर समाजात व्यापक जनजागृती व्हावी, तसेच या संदर्भातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकेचा अभ्यास व्हावा, या उद्देशाने माजी न्यायाधीश तथा लेखक अनिल वैद्य यांनी लिहिलेला **'उपवर्गीकरण, क्रिमीलेअर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका'** हा ग्रंथ उपलब्ध आहे, असे ज्येष्ठ साहित्यिक श्रीराम बनसोड यांनी सांगितले.

सोप्या व संदर्भाधारित भाषेत लिहिलेल्या या ग्रंथाची पहिली आवृत्ती अल्पावधीत संपुष्टात आली असून दुसऱ्या आवृत्तीसाठी प्रकाशनपूर्व नोंदणी सुरू करण्यात आली आहे. समाजातील कार्यकर्ते, अभ्यासमंडळे, संघटना आणि नागरिकांनी हा ग्रंथ अभ्यासासाठी तसेच जनजागृतीसाठी वापरावा, असे आवाहन केले आहे. ग्रंथाचे देणगी मूल्य ६० रुपये असून विशेष सवलतीत १०० प्रती ३,०००, ५० प्रती २,००० आणि २५ प्रती १,००० या दराने उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी चैतन्य प्रकाशन, नाशिक यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक श्रीराम बनसोड यांनी केले आहे.

# पुणे हीच आता माझी कर्मभूमी : किसन थुल

**पुणे :** 'भाषणे खूप झाली; आता समाजाला विधायक कार्याची गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्यातील बंगल्याच्या जतनासाठी जे काही करता आले ते मी सर्वांच्या सहकार्याने केले. या कार्याचे तुम्ही सर्व साक्षीदार आहात. चंद्रपूर ही माझी जन्मभूमी असली, तरी आता पुणे हीच माझी कर्मभूमी झाली आहे. तळेगाव दाभाडे येथे समाजासाठी भव्य सामाजिक सभागृह उभारण्याचे ध्येय मी हाती घेतले आहे,' असे प्रतिपादन समाजसेवक किसन थुल यांनी केले. पुण्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बंगल्यात किसन थुल मित्र परिवार, तळेगाव दाभाडे (पुणे) यांच्या वतीने किसन थुल यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी सत्काराला उत्तर देतांना त्यांनी हे विचार व्यक्त केले. यावेळी बाबाराव अंभोरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, किसन थुल यांनी दलित पँथर, बामसेफ आणि बहुजन समाज पक्षामध्ये कार्य केल्यानंतर धम्मकार्यात सक्रिय योगदान दिले. प्रज्ञांकुर निकम यांनी, 'शिस्तबद्ध पद्धतीने कार्य करण्याची प्रेरणा मला किसन थुल यांच्याकडून मिळाली,' असे सांगितले. चरणदास सावंत यांनी धम्मकार्यामध्ये पूर्ण समर्पणाने कार्य करण्याची गरज व्यक्त केली. बहुजन सौरभचे कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी सांगितले की, सामाजिक चळवळीतून किसन थुल हे लेखक म्हणूनही पुढे आले. 'लढा डॉ. बाबासाहेबांच्या बंगल्याचा' हे त्यांचे गाजलेले पुस्तक आहे. तसेच त्यांनी पीपल्स पब्लिकेशन्सची स्थापना करून अल्पावधीत २५ हून अधिक नवोदित लेखकांची पुस्तके प्रकाशित केली आहेत. भागवत बिऱ्हाडे यांनी विविध जिल्ह्यांतील कार्यकर्ते आणि समाजबांधव या कार्यक्रमासाठी पुण्यात उपस्थित झाल्याचे सांगितले. मनोहर पगारे यांनी, ‘प्रामाणिकपणे समाजकार्य केले तर लोकांचे सहकार्य आपोआप मिळते,’ असे मत व्यक्त केले. याप्रसंगी किसन थुल आणि माधुरी थुल यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन संजय गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक संतोष मेश्राम यांनी, तर आभार प्रदर्शन विश्वजीत थुल यांनी केले. कार्यक्रमाला विविध भागांतून आलेल्या समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# 'वनार्टी'मध्ये वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



**नागपूर :** हरित क्रांतीचे शिल्पकार आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर येथे अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या संस्थेतील अधिकारी, कर्मचारी, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. कार्यक्रमाची सुरुवात 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी मार्गदर्शन करतांना त्यांनी स्व. वसंतराव नाईक यांच्या कृषी, सिंचन, ग्रामीण विकास आणि शेतकरी कल्याणासाठीच्या दूरदृष्टीपूर्ण कार्याचा आढावा घेतला. त्यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या कृषी आणि ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. वसंतराव नाईक यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन समाजहित, गुणवत्तापूर्ण प्रशासन आणि जनसेवेसाठी समर्पित भावनेने कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमात प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजविकासासाठी योगदान देण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमास प्रकल्प व्यवस्थापक डॉ. चेतन बन्सोड यांच्यासह संस्थेचे अधिकारी, कर्मचारी, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कामठीच्या नवयुवक उच्च प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत

**कामठी :** नवयुवक उच्च प्राथमिक शाळा, गौतमनगर, कामठी येथे नवीन शैक्षणिक सत्राच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्प व मिठाई देऊन उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाबाबत आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांना इयत्तानिहाय पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. तसेच नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश, टाय आणि बेल्टचे वाटप करण्यात आले.

मुख्याध्यापक विजय नंदनवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमाला भदंत नागदीपंकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच पालक प्रतिनिधी वैशाली मनोज जैसवार यांचीही विशेष उपस्थिती होती.

यावेळी भदंत नागदीपंकर आणि मुख्याध्यापक विजय नंदनवार यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देत नियमित अभ्यास, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन राजकुमार शेन्डे यांनी केले, तर दिलीप मस्की यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रल्हाद डोंगरे, राखी बागडे, दीक्षा फुले आणि विभा सोनडवले यांनी विशेष सहकार्य केले.

# भारतीय बौद्ध महासभा महानगरची बैठकीत वर्षावासानिमित्त प्रवचनमाला व विविध उपक्रमांचा निर्णय



**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा, नागपूर महानगर यांच्यावतीने समता बुद्ध विहार, शताब्दी चौक, द्वारकापुरी येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले. भंते कुशल धम्मसुंदरो यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस केंद्रीय शिक्षक देवानंद वानखेडे, गणपत पेठकर आणि बी.के. हिवराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत वर्षावासानिमित्त नागपूर शहरातील विविध बुद्ध विहारांमध्ये धम्म प्रवचनमाला सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. तसेच श्रामनेर व बोधाचार्य शिबिर, वर-वधू सूचक मंडळ, तसेच समता सैनिक दलाच्या संघटनात्मक बांधणी या विषयांवर सखोल चर्चा केली.

यावेळी समता सैनिक दलाचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने वर-वधू सूचक मंडळाचे उद्घाटन २९ जून रोजी करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. याशिवाय जुलै महिन्यात दहा दिवसीय श्रामनेर शिबिर आयोजित करण्याची माहितीही देण्यात आली. बैठकीस केंद्रीय संघटक पद्माकर गणवीर यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी १ जुलै रोजी दीक्षाभूमीवर आयोजित आंदोलनाची भूमिका उपस्थित पदाधिकाऱ्यांसमोर स्पष्ट केली. बैठकीला रवींद्र एस. डोंगरे, विनय ढोके, विजय पाटील, हरिदास नारनवरे, संघशील मेश्राम, अरुण भारशंख, धनराज राजवंश, अंकुश गणवीर, मनोज वाळके, बौधेंद्र डोंगरे, नामदेव निकोसे, नंदलाल मेश्राम, अरुण शेंडे, देवेंद्र लांजेवार, अमरदीप पझारे, नरेंद्र थूल यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीचे संचालन प्रवीण कांबळे यांनी केले. बैठकीमागील उद्देश व भूमिका शहराध्यक्ष विजय मेश्राम यांनी स्पष्ट केली, तर गंगाधर कांबळे यांनी आभार मानले.

# सुरेश झुरमुरे यांना आदर्श माजी विद्यार्थी सन्मान



**नागपूर :** उमरेड येथील जीवन शिक्षण मंडळाच्या माजी विद्यार्थ्यांच्या समूहातर्फे देण्यात येणारा 'आदर्श माजी विद्यार्थी सन्मान' पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुरेश झुरमुरे यांना जाहीर झाला आहे. हा सन्मान सोहळा १३ सप्टेंबर रोजी उमरेड येथे होणार असल्याचे जीवन विकास माजी विद्यार्थी परिवार समितीचे अध्यक्ष अरविंद बाकडे यांनी कळविले आहे. हा सत्कार सोहळा ज्येष्ठ सनदी अधिकारी ई.झेड. खोब्रागडे, ज्येष्ठ संपादक बाळ कुळकर्णी आणि पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. जीवन विकास विद्यालय १९६३ पासून सुरू असून, या विद्यालयात शालेय शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी आज वेगवेगळ्या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करीत आहेत. त्यातील दरवर्षी एका माजी विद्यार्थ्याच्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान करण्यात येतो. याआधी जगविख्यात न्यूरोलॉजिस्ट पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम व भारतीय रंगभूमीवर वेगळ्या विचारवाही नाट्यकलाकृतींनी ठसा उमटवणारे ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. सुरेश झुरमुरे हे जीवन विकास विद्यालयाचे माजी विद्यार्थी असून या संस्थेचे विद्यमान उपाध्यक्ष आहेत. नायब तहसीलदार म्हणून ते शासकीय सेवेतून निवृत्त झाले आहेत. त्यांनी राज्य कर्मचारी संघटनेत महत्वाची भूमिका बजावली. रक्तदान, नेत्रदान आणि देहदान चळवळीत सहभाग घेतला. त्यांच्या पुढाकाराने १५ देहदान व २५० नेत्रदान करण्यात आले आहे. १९७२ मध्ये त्यांनी उमरेडमध्ये आझाद हिंद मंडळाची स्थापना केली. या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, व्यवसाय मार्गदर्शन आदी उपक्रम राबवले जातात. साने गुरुजी ज्येष्ठ नागरिक मंडळाचे ते उपाध्यक्ष आहेत. ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी नररत्न डेकाटे स्मारक समितीचे ते संस्थापक सदस्य आहेत. गेले साडेतीन दशकांपासून ते प्रा. श्याम मानव यांच्या अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीमध्ये सक्रिय असून ते आता राष्ट्रीय कार्याध्यक्ष म्हणून चळवळीत योगदान देत आहेत. जादूटोणा विरोधी परिषद, संत गाडगेबाबा जनजागरण अभियान, फल ज्योतीशी विरोधी अभियान, फुले-आंबेडकर अंधश्रद्धा निर्मूलन अभियान, जादूटोणा विरोधी कायद्याचा प्रचार-प्रसार करण्यात त्यांची महत्वाची भूमिका आहे. त्यांनी आजवर शेकडो व्याख्याने दिली आहेत.

# समता सैनिक दलाच्या राष्ट्रीय बैठकीत शताब्दी वर्षाच्या कार्यक्रमांची रूपरेषा निश्चित



**नागपूर :** समता सैनिक दलाची राष्ट्रीय बैठक रविवारी जी. के. माने प्रशिक्षण केंद्र, पारडी, नागपूर येथे राष्ट्रीय अध्यक्ष डी.एफ. कोचे यांच्या अध्यक्षतेखाली आणि राष्ट्रीय जीओसी डॉ. प्रदीप डोंगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडली. बैठकीत समता सैनिक दलाच्या शताब्दी वर्षानिमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांसह संघटन विस्तार, सामाजिक प्रश्न आणि आगामी कार्ययोजनांवर सविस्तर चर्चा झाली.

बैठकीची सुरुवात भारतरत्न बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून, जय भीम सल्यूट तसेच त्रिशरण व पंचशीलच्या सामूहिक पठणाने झाली. बैठकीत १९ मार्च २०२७ रोजी समता सैनिक दलाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर वर्षभर देशभरात सामाजिक, सांस्कृतिक, संघटनात्मक, प्रशिक्षण आणि जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. शताब्दी वर्ष हे संघटन बळकटीकरण, सामाजिक परिवर्तन आणि समतावादी विचारांच्या प्रसाराचे वर्ष म्हणून साजरे करण्याचा निर्धार व्यक्त केला.

दीक्षाभूमी, नागपूर येथे अनुवर्तन दिनानिमित्त आयोजित सेवा व सुरक्षा शिबिरासाठी पृथ्वी मोटघरे यांची कॅम्प चीफ, प्रा. संजय घोडके यांची कोष संचालन, युवराज बडगे यांची सहायक कोष संचालन, भूषण राऊत यांची ऑडिटर आणि अमर दीपांकर यांची शासकीय पत्रव्यवहार व केंद्र समिती समन्वयक म्हणून नियुक्ती केली.

मार्गदर्शन करताना डॉ. प्रदीप डोंगरे यांनी शताब्दी वर्ष हे सामाजिक बांधिलकी अधिक मजबूत करण्याचे वर्ष असल्याचे सांगितले. महाबोधी विहाराचा प्रश्न, अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण, अनुसूचित जाती-जमातींवरील अत्याचार तसेच बहुजन समाजासमोरील विविध प्रश्नांवर व्यापक जनजागृती करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय सामूहिक मार्च, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रशिक्षण शिबिरे आणि नवीन शाखांच्या स्थापनेवर भर देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात डी. एफ. कोचे यांनी समता सैनिक दलाचा गौरवशाली इतिहास अधोरेखित करत संघटनात्मक शिस्त, वरिष्ठांचा आदर आणि सक्षम नेतृत्वाची गरज यावर भर दिला. शताब्दी वर्ष यशस्वी करण्यासाठी प्रत्येक अधिकारी व सैनिकाने सक्रिय व समर्पित भूमिका पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले. बैठकीत अमर दीपांकर, संघप्रिय नाग (लाडे), गजेन्द्र गजभिये, पी.सी. टेंभरे, पृथ्वी मोटघरे, प्रा. संजय घोडके, राजकुमार वंजारी, हर्षल गायकवाड, जयंता साहारे, भूषण राऊत तसेच सरिता लाडे यांनीही मार्गदर्शन केले.बैठकीच्या यशस्वीतेसाठी प्रमोद खांडेकर, आकाश मोटघरे, विलास नागदेवे, नरहरी मोटघरे, मिलिंद धारगावे, मुनेश्वर नागदेवे, अरविंद नंदेश्वर, बी.एम. बागडे, चंद्रप्रकाश देशभ्रतार, सुरेखा टेंभुर्णे, प्रफुल्ल रामटेके, बाबाराव चारे, रमेश रंगारे, प्रवीण ठाकरे, शेषराव बागडे, राधिका रामटेके आणि सिद्धार्थ मेश्राम यांच्यासह अनेक अधिकारी व सैनिकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन अमर दीपांकर यांनी केले.

## निधन वार्ता

### अशोकभाई नगदिया



**नागपूर :** वाठोडा परिसरातील अशोकभाई नगदिया (६८) यांचे बुधवारी घरीच अकस्मात निधन झाले. त्यांच्यावर गंगाभाई घाट येथे गुरुवारी अंत्यसंस्कार करण्यात आलेत. त्यांच्या पश्चात मुलगा गोपाल, एक मुलगी सून जावई आणि नातवंडे असा बराच फक्त परिवार आहे .

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, उमरेड यांचे कार्यालय
तालुका उमरेड, जिल्हा नागपूर – 441203
दूरध्वनी क्र. 07116-219051
इ- मेल: tahasilofficeumred@gmail.com
क्र.म.स./जन्म- मृत्यु/तह -उम/कावि - 401/2026
दिनांक: 04/06/2026

## जाहीरनामा

अर्जदार श्रीमती सीमा रूपचंद पाटील, रा. सरिता मोरेश्वर गोलाईत यांचे घरी, प्लॉट क्र. ७, बिरसा नगर, न्यू आदर्श कॉलनी, नागपूर यांनी त्यांची आई स्व. लताबाई केवाजी गजभिये यांचा मृत्यू दि. 31/05/1993 ची नोंद ग्रामपंचायत वेलसाखरा येथील जन्म-मृत्यू नोंदवहीत घेण्यासाठी नियमानुसार अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी जाहीर करतो की, सदर व्यक्तीच्या मृत्यूबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देण्याकरिता कार्यवाही प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने सर्व संबंधितांना जाहीर करण्यात येते की, सदर मृत्यू नोंद करण्याबाबत कोणत्याही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप किंवा दावा असल्यास त्यांनी त्यासंबंधीचे लेखी निवेदन, आवश्यक पुरावे व साक्षीदारांसह हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, उमरेड यांच्या कार्यालयात सादर करावे. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही आक्षेप किंवा दावे विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच, निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत, आक्षेप किंवा विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास कोणालाही काही म्हणणे नाही असे गृहीत धरून लागू असलेल्या नियमांनुसार सदर मृत्यू नोंद करण्याबाबतचा आदेश पारित करण्यात येईल.

स्वाक्षरी
तहसीलदार तथा
तालुका दंडाधिकारी, उमरेड

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648